**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठातर्फे पर्यावरण पुरस्कार नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे दरवर्षी पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था (गट अ) व व्यक्ती (गट ब) यांना पर्यावरण पुरस्कार प्रदान करुन गौरविल्या जाते. यावर्षी हा पुरस्कार राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिनानिमित्ताने दि. ०२ डिसेंबर, २०१९ रोजी ससन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

सन २०१९ चा पर्यावरण पुरस्कार प्राप्त करण्यास इच्छूक व्यक्ती/संस्थांसाठी सविस्तर माहिती व आवेदनपत्र विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर 'डाऊनलोड' या शिर्षांतर्गत 'अवार्ड अचिव्हमेन्ट' मध्ये उपलब्ध आहे. सदर अर्ज याच संकेतस्थळावरुन विहित मुदतीत ऑनलाईन भरता येईल. तरी इच्छुकांनी दि. ३१ ऑगस्ट, २०१९ किंवा त्यापूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र (हार्डकॉपी) विद्यापीठाकडे पाठवावे, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे. अधिक माहितीकरीता उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांचेशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधितांचे माहितीकरीता कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी,
दै. ............................
अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २४/०७/२०१९.

कृपया सोबतचे वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकात सविस्तर प्रकाशित करावे, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी